# राजे उमाजी नाईक

(दि. ७ सप्टेंबर, १७९१-३ फेब्रुवारी, १८३२)

(अल्प परिचय)

एक प्रसिद्ध क्रांतिकारक. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी घडून आलेल्या रामोशांच्या उठावात उमाजी नाईक यांचे नेतृत्व महत्त्वाचे होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील भिवडी (ता. पुरंदर) येथे झाला. वडील दादोजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याचे रखवालदार म्हणून काम करत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून अनेक किल्ल्यांची राखणदारी या समाजाकडे सोपविण्यात आली होती. उमाजी लहानपणापासून वडिलांसोबत पुरंदरच्या रखवालीचे काम करत. आपल्या वडिलांकडून त्यांनी गोफण चालविणे, तीरकमठा चालवणे, कुऱ्हाड चालविणे, भाला फेकणे, तलवार व दांडपट्टा चालविणे इ. कौशल्ये आत्मसात केली होती. उमाजी ११ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले (१८०२) आणि वंशपरंपरेने वतनदारी त्यांच्याकडे आली.

दि.८ ऑगस्ट, १८३१ रोजी इंग्रजांनी एक जाहिरनामा काढून उमाजींना पकडून देणाऱ्यास रु. १०,००० बक्षीस व ४०० बीघे जमीन देण्याचे जाहिर केले. या आमिषाला उमाजींचे दोन साथीदार काळू व नाना हे बळी पडले. दि. १५ डिसेंबर, १८३१ रोजी त्यांनी उमाजींना पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्यानंतर इंग्रजांनी उमाजींना पुणे येथे दि. ३ फेब्रुवारी, १८३२ रोजी फाशी दिली.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)